## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९ (३) अन्वये झालेले व्दितीय अपिल

### अपिल क्रमांक : के.आर- १७१२/२०२६

**अपिलार्थी, श्री.महेश पांडुरंग भोईर,**
संत रोहिदास वाडा, जोकर प्लाझा जवळ,
कल्याण (प), जि.ठाणे ४२१ ३०१.

विरुध्द

जन माहिती अधिकारी, बांधकाम विभाग,
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली
महानगरपालिका कल्याण, स्वामी दामोदरचार्य हॉल,
पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

प्रथम अपिलीय प्राधिकारी, बांधकाम विभाग,
३/क प्रभागक्षेत्र कार्यालय, कल्याण डोंबिवली
महानगरपालिका कल्याण, स्वामी दामोदरचार्य हॉल,
पहिला मजला, सांगळेवाडी, कल्याण (प.),
ता.कल्याण, जि.ठाणे ४२१ ३०१.

द्वितीय अपिल अर्ज सुनावणीचा दिनांक : २२.०९.२०२६

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दाखल दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २३.०९.२०२५ | -- | १२.११.२०२५ | १७.०२.२०२६ |

अपिलार्थी यांनी दि. ०४.०५.२०२६ रोजीच्या अर्जान्वये *"अपूर्ण माहिती मिळाली "*असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपिलावर आज दिनांक २२.०९.२०२६ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस अपिलार्थी उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय प्राधिकारी तसेच जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत).

अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

*" वॉर्ड क्र.३५ संत रोहिदास वाडा येथील रस्ता येथील गटारे लादी नुतनीकरण बाबतची माहिती मिळणेबाबत.*

*वॉर्ड क्र.३५, संत रोहिदास वाडा येथील नविन बनवलेला रस्ताबाबत नवीन कागदपत्रे मिळणेबाबत.*

*१) ब/ठेकेदारी करार, २) संत राहिदास वाडा येथील नवीन बनविण्यात आलेल्या गटाराचे बांधकामाचे नवीन कागदपत्रे व ठेकेदारी करार मिळणेबाबत. ३) पायवाटेतील लादी नवीन बनविण्यात आलेले सर्व कागदपत्रे मिळणेबाबत. ४) ३/ब ठेकेदारांसमवेत झालेल्याची छायांकित प्रत मिळावी. "*

तद्नंतर अपिलार्थी यांनी “अपुरी माहिती प्राप्त झाली” असे कारण नमूद करुन दि.१२.११.२०२५ रोजी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले आहे.

प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.१७.०२.२०२६ रोजी पुढील प्रमाणे आदेश पारित केले आहेत.

*“जन माहिती अधिकारी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती असल्याने माहिती दिली नाही. माहितीचे स्वरुप व्यापक असल्याने अपिलकाराने विशिष्ट स्वतंत्र अर्ज करण्यात यावे. अर्ज केल्यानंतर अपिलकारास १५ दिवसात नि:शुल्क माहिती पुरविण्यात यावी.*

*सबब वरीलप्रमाणे निर्णय देवून अपील निकाली काढण्यात येत आहे.”*

अपिलार्थी यांनी सुनावणी दरम्यान असे नमूद केले की,त्यांना अपूर्ण माहिती प्राप्त झाली आहे.

सदर प्रकरणी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी अपिलार्थी यांनी माहिती अधिकार अर्जान्वये मागीतलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची असल्याचे कारण नमूद करुन, अपील निकाली काढले आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अधिकार अधिनियमांतर्गत केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने एकाच रस्त्याबाबतची माहिती मागीतली आहे. सदर माहिती ही विस्तृत स्वरुपाची माहिती ठरत नाही. त्यामुळे विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली माहिती पुरविणे योग्य होईल. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागीतलेली संपूर्ण माहिती ३० दिवसात शिघ्र टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. उपरोक्त निर्देशासह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र२॥६

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : २२ सप्टेंबर, २०२६ .

राज्य माहिती आयोग
सत्यमेव जयते
महाराष्ट्र

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

राज्य माहिती आयोग
कोंकण खंडपीठ